॥ ज्ञ विद्या वा विमलतये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246

E-mail: affiliation@srtmun.ac.in

जा.क्र. शैक्षणिक / संलग्न—०३ / नविन—फार्मसी / २०२१-२०२२/246 दिनांक : २८.०९.२०२१

प्रति,
मा. अध्यक्ष / सचिव,
विवेक वर्धिनी सेवाभावी संस्था, परभणी या संस्थेचे डी.फार्मसी कॉलेज,
पिंगळी ता.जि. परभणी.

विषय :— आपल्या महाविद्यालयातील B.Pharmacy या अभ्यासक्रमास प्रथम संलग्नीकरण प्रदान करणे बाबत.

संदर्भ :— १. फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे DECISION LETTER, दि. ०४.०८.२०२१

२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्र. टीईएम २०२१/प्र.क्र. ११०/ तांशि—४, दि. २९.०७.२०२१.

३. शैक्षणिक संलग्न—०३/परभणी/२०२१—२२/१२४, दि. २७.०८.२०२१.

४. मा. विद्या परिषद बैठक ऐनवळचा विषय क्र. ११/५२—२०२१ दि. २१.०९.२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली व पत्र क्र. ०२ अन्वये महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई, यांनी आपल्या नविन महाविद्यालयात B.Pharmacy हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

आपल्या महाविद्यालयास B.Pharmacy या पदवी अभ्यासक्रमास संलग्नीकरण प्रदान करणे संदर्भात पत्र क्र. ०३ अन्वये डॉ. एस.जी. गट्टाणी यांचे अध्यक्षतेखाली पाहणी समिती महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० नुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन याबाबत अहवाल सादर केलेला आहे. समितीने अहवालातील दर्शविलेल्या खालील अटींची पुर्तता सहा महिण्याच्या आत करण्याच्या अटींवर संदर्भ क्र. ०४ अन्वये मा. विद्या परिषदेने आपल्या महाविद्यालयातील B.Pharmacy या पदवी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह (कायम अनुदान तत्वावर) प्रथम संलग्नीकरणास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार सदरील अभ्यासक्रमास प्रथम संलग्नीकरण प्रदान करण्यात येत आहे.

Conditions subject to compliance of the deficiencies within six months.

01. Approved Principal and faculty to be appointed.
02. Infrastructure & amenities for next year be ready within Six months.
03. Reprography facility to be made available in Library.
04. Circulation area occupied by store, Library etc to be cleaned[1] immediately.
05. Toilet blocks, drinking water facility to be made available on each floor.

---

उपरोक्त महाविद्यालयांत कायम अर्हताप्राप्त प्राचार्य, शिक्षक व ग्रंथपाल यांची निवड विद्यापीठ निवड समिती मार्फत करुन त्यांचा अहवाल सादर करावा. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी याचीही माहिती दयावी व संचालक, तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

आपल्या महाविद्यालयास B.Pharmacy हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देतेवेळी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमांचे पालन करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील. कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

०१. मा. अव्वर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई–४०० ०३२.
०२. मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती ईमारत, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे–०३.
०३. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, आनंदनगर रोडवर, दयानंद नगर, नांदेड.
०४. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
०५. मा. उपकुलसचिव, परीक्षा (पात्रता) व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
०६. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक (मान्यता) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
०७. मा. सहा. कुलसचिव, अभ्यासमंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
०८. मा. सहा. कुलसचिव, विशेष कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.